!! सर्वांगिण ग्रामविकास – हाच धुळे जिल्हा परीषदेचा ध्यास !!

# धुळे जिल्हा परिषद

## (पशुसंवर्धन विभाग)

**E-mail :-** dahodhule1@gmail.com **Ph.No.**02562-295214

जा.क्र. जिपधु/पसं/तांत्रिक-1/228-232/2025 धुळे दिनांक 03/05/2025

**प्रति,**
**मा. जिल्हा माहिती अधिकारी,**
**जिल्हा माहिती कार्यालय,**
**धुळे.**

**विषय :- पशुसंवर्धन विभागाच्या वैयक्तिक लाभाच्या योजनांसाठी Online अर्ज करणे बाबत**
**संदर्भ :-** मा. आयुक्त पशुसंवर्धन पुणे यांचे पत्र जा.क्रं. कुक्कूट 2/प्रक्र 23 भाग 2/5116-5293/2024 पुणे पंस-13 दिनांक 02/03/2025

महोदय,

उपरोक्त विषयान्वये, जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत, नाविन्यपुर्ण व जिल्हास्तरीय योजनेमधुन दि. 03/05/2025 ते 02/06/2025 या कालावधीत अर्ज https://ah.mahabms.com या संकेतस्थळावर व Google Play स्टोर वरील मोबाईल ॲप वर स्विकारण्यात येत आहेत.

नाविण्यपुर्ण राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय योजनेअंतर्गत दुधाळ गाई-म्हशींचे गट वाटप करणे, शेळी-मेंढी गट वाटप करणे, 1000 मांसल कुक्कूट पक्षांच्या संगोपनासाठी निवारा शेड अर्थसहाय्य इ. योजनांसाठी ऑनलाईन अर्ज स्विकारण्यात येत आहेत.

योजनांची संक्षिप्त माहिती तसेच अर्ज करण्याची पद्धत याची माहिती सोबत जोडलेल्या वृत्तपत्रात प्रसिद्धीस दयावयाच्या प्रेसनोट मध्ये नमुद आहे.

तरी आपल्यामार्फत जिल्हातील वर्तमानपत्रात विनामुल्य प्रसिद्धी मिळावी हि विनंती.

( स्वाक्षरी XXXX )
**जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी**
**जिल्हा परिषद, धुळे.**

( स्वाक्षरी XXXX)
**जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त**
**धुळे.**

**माहितीस्तव सविनय सादर**

1. **मा.अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.धुळे.**

**माहितीस्तव तथा कार्यवाहीस्तव**

1. **गटविकास अधिकारी पंचायत समिती धुळे / शिंदखेडा / शिरपुर / साक्री.**

**!! सर्वांगिण ग्रामविकास – हाच धुळे जिल्हा परीषदेचा ध्यास !!**

# धुळे जिल्हा परिषद

## (पशुसंवर्धन विभाग)

**E-mail** :- dahodhule1@gmail.com **Ph.No.**02562-295214

जा.क्र. जिपधु/पसं/तांत्रिक-1/228-232/2025 धुळे दिनांक 03/05/2025

# प्रेसनोट

## पशुसंवर्धन विभागांतर्गत विविध वैयक्तिक लाभाच्या योजनांसाठी अर्ज करण्याचे अवाहन

राज्याच्या ग्रामीण भागातील सुशिक्षित व बेरोजगार युवकासह पशुपालक व शेतकरी बांधवाना स्वयंरोजगाराचे साधन उपलब्ध करून देत, त्यांना शाश्वत अर्थाजनाचा पर्याय उपलब्ध करून देत पशुसंवर्धन विभागाने विविध योजना व उपक्रमांद्वारे ग्रामीण महाराष्ट्राचे अर्थचक्र गतिमान ठेवण्याचा नेहमीच प्रयत्न केला आहे.

विविध योजना व उपक्रमांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील पशुपालक / शेतकरी बांधवांना स्वयंरोजगाराचे साधन उपलब्ध करून देण्यासाठी कटिबध्द असलेल्या महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन विभागाच्या वतीने वैयक्तिक लाभाच्या योजनांतर्गत प्रक्रिया अधिक पारदर्शक करणेसाठी राज्यस्तरीय नाविन्यपूर्ण योजनेमध्ये गेली सात वर्षे ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविणे व लाभार्थी निवड करण्याची पध्दत सुरू करण्यात आली आहे. सन २०२१-२२ पासून जिल्हास्तरीय पशुसंवर्धन विषयक विविध योजनांसाठी सुद्धा सदर संगणक प्रणाली लागू करण्यात आली आहे.

यामध्ये शासनाने एखाद्या योजनेकरिता अर्ज केल्यानंतर त्यास दरवर्षी पुन्हा अर्ज करावे लागू नये यासाठी तयार केलेली प्रतिक्षा यादी सन २०२१-२२ पासून पुढील ५ वर्षापर्यंत म्हणजे सन २०२५-२६ पर्यंत लागू ठेवण्याची सोय केली आहे. त्यामुळे अर्ज केलेल्या पशुपालकांना लाभ मिळण्याची शक्यता वाढली असून, त्याची प्रतिक्षा यादीतील क्रमांकानुसार अंदाजे केव्हा लाभ मिळेल हे कळू शकल्यामुळे लाभार्थी हिस्सा भरणे किवा इतर बाबींकरिता नियोजन करता येणे शक्य होणार आहे.

त्यानुसार नाविन्यपूर्ण राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय योजनेंतर्गत दुधाळ गाई- म्हशींचे गट वाटप करणे, शेळी-मेंढी गट वाटप करणे, १००० मांसल कुक्कुट पक्षांच्या संगोपनासाठी निवारा शेड उभारणीस अर्थसहाय्य देणे, १०० कुक्कुट पिलांचे वाटप व २५+ ३ तलंगा गट वाटप या योजनांसाठी ऑनलाईनपध्दतीने लाभार्थी निवड प्रक्रिया सन २०२५-२६ या वर्षात राबविली जाणार आहे. पशुपालकांना डेअरी, पोल्ट्री किंवा शेळीपालन यापैकी ज्या बाबींमध्ये अर्ज करावयाचा आहे त्याची निवड करण्यची सुविधा देखील उपलब्ध करून देण्यात आली आहे. राज्यातील पशुपालक / शेतकरी बांधव, सुशिक्षीत बेरोजगार युवक / युवती व महिलांनी या योजनांचा लाभ घेण्यासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज दाखल करण्याचे आवाहन पशुसंवर्धन विभागामार्फत करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी संकेतस्थळ | https://ah.mahabms.com |
| अँड्रॉईड मोबाईल ॲप्लिकेशनचे नाव | AH-MAHABMS<br>(Google play Store वरील मोबाईल ॲपवर उपलब्ध) |
| अर्ज करण्याचा कालावधी : | ०२.०५.२०२५ ते ०१.०६.२०२५ |
| टोल फ्री क्रमांक : | १९६२<br>(वेळ: सोमवार ते शनिवार सकाळी ७.० ते सायंकाळी ६.०) |
| अधिक माहितीसाठी नजीकचा पशुवैद्यकीय दवाखाना, पशुसंवर्धन विभाग (पंचायत समिती, जिल्हा परिषद), जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त कार्यालयात संपर्क साधावा | |

योजनांची संपूर्ण माहिती तसेच अर्ज करण्याची पध्दती याबाबतचा संपूर्ण तपशील या संकेतस्थळावर तसेच मोबाईल ॲपवर उपलब्ध आहे. अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीनेच स्विकारले जातील.

या संगणकप्रणालीमध्ये अर्ज भरणे अत्यंत सुलभ करण्यात आले असून, अर्जामधील माहिती कमीत कमी टाईप करावी लागेल आणि बहुतांशी माहितीबाबत पर्याय निवडण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे पशुपालकांनी अर्ज भरण्याकरिता स्वताचे मोबाईलचा जास्तीत जास्त वापर करावा. अर्ज भरताना अर्जदाराने नोंदविलेल्या मोबाईल क्रमांकावर अर्जाच्या स्थितीबाबत संदेश पाठविण्यात येणार असल्याने कोणत्याही परिस्थितीत अर्जदाराने योजनेंतर्गत आपला मोबाईल क्रमांक बदलू नये व **मागिल वर्षी अर्ज केलेल्या अर्जदारांनी पुन्हा अर्ज करावयाची आवश्यकता नाही.**

योजनेबाबत अधिक माहितीसाठी वरील तक्त्यात दर्शविलेल्या टोल फ्री क्रमांकावर किंवा तालुक्याचे पशुधन विकास अधिकारी (विस्तार), पंचायत समिती, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी अथवा उपआयुक्त कार्यालय, तालुका लघुपशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय अथवा नजीकच्या पशुवैद्यकीय केंद्रावर संपर्क साधावा. असे आवाहन मा. विशाल सविता तेजराव नरवाडे, प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केले आहे.

( स्वाक्षरी XXXX )
**जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी**
**जिल्हा परिषद, धुळे.**

( स्वाक्षरी XXXX)
**जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त**
**धुळे.**